**<u>प्रतिवादी तर्फे सा.क्र.१ प्रतिवादी क्र.३ यशवंत बापू सारंग यांचा उलटतपास वादी व प्रतिवादी क्र.६ ते ८ तर्फे विधीज्ञ श्री. ए.एम.माणगावकर यांचे मार्फत शपथेवर सुरु .</u>**

१२. माझी जन्म तारीख ११/०३/१९५७ अशी आहे. मी बी.ए. पास आहे. माझे शिक्षण मुंबई येथे झाले. हे म्हणणे खरे आहे की, मी औदुंबर सोसायटी, माझगाव डॉक येथे राहत होतो. मी सन १९८७ साली कांदिवली येथील महिंद्रा मध्ये नोकरीस लागलो व मी सन २००० साली स्वेच्छा निवृत्ती घेतली. सन २००० साला नंतर मी शेती करु लागलो. माझे वडील बापू हे सन २००९ साली मयत झाले. माझ्या वडिलांचे पूर्ण नाव बापू घारु सारंग असे होय. हे म्हणणे खरे आहे की, घारु यांची दोन लग्ने झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ५ चे वडील बापू घारु सारंग व प्रतिवादी क्र.६ ते ८ यांची आई विटा घारु सारंग अशी अपत्ये होती. हे म्हणणे खरे आहे की, दुसरी पत्नी पार्वती हिच्या पासून वादी देऊ हे एकमेव अपत्य होते. हे म्हणणे खरे आहे की, चिंचवड हे गाव मूळ मोंड या गावापासून बनलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आत्या विटा हिला चिंचवड या गावी दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, तिचे लग्ना नंतरचे नाव यशोदा धोंडू पोसम असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आजोबा घारु हे पोर्ट ट्रस्ट मध्ये नोकरीस होते. हे म्हणणे खरे नाही की, घारु यांची पत्नी पार्वती हिला घारु यांच्या पश्चात पेन्शन मिळत असे. घारु हे अशिक्षीत होते. आता मला नि.क्र.५३ येथील खरेदी खत दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५३ येथील खरेदी खतामध्ये माझ्या वडिलांचा व्यवसाय शेती असा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.५३ येथील खरेदी खतामध्ये माझे वडील नोकरी करत होते असा उल्लेख नाही. आता मला नि.क्र.५३ येथील खरेदी खत दाखविण्यात आले. त्यामध्ये माझे वडील नोकरी करत होते असा उल्लेख नाही. नि.क्र.५३ येथील खरेदी खतावेळी माझे वडील नोकरी करत होते हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५३ येथील खरेदी खतामध्ये माझ्या वडिलांनी मामा कडून पैसे आणले असा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी त्यांच्या मामा कडून खरेदी खता करिता पैसे आणले असा दर्शविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५३ येथील

खरेदी खतावेळी माझ्या वडिलांकडे २५०/- रुपये होते हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीस वादी याचे नाव फेरफार क्र.३४३८ अन्वये दाखल झाले. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्र.३४३८ ला माझ्या वडिलांनी हरकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या कामी व्ही.पी.परांजपे हे माझ्या वडिलांचे वकील होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या कामी माझ्या वडिलांनी लेखी स्वरुपात हरकत पाठवली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्याकामी माझे वडील, यशोदा धोंडू पोसम व पार्वती घारु सारंग यांचे जबाब झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, चौकशी अंती फेरफार क्र.३४३८ मंजूर होऊन वादीचे नाव सातबारा सदरी नोंद झाले. हे म्हणणे खरे नाही की, चौकशी कामी एक नकाशा व मजकूर तडजोडी नुसार हजर केला होता. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्र.३४३८ ची चौकशी सन १९६५-६६ साली चालले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर आदेशा विरोधात मी अपील नं.२४/२००६ उपविभागीय अधिकारी, कणकवली यांच्याकडे अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपील विलंब व पुराव्याचा अभाव या कारणास्तव फेटाळण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे आर.टी.एस. अपील नं.१३८/२००९ दाखल केले. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपिलामध्ये फेरफार क्र.३४३८ रद्द करुन जरुरतर दिवाणी न्यायालयात दाद मागावी असा आदेश पारित करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, सदर निर्णय विभागीय आयुक्त यांनी रिवीजन क्र.२२१/२०१४ अन्वये कायम केला. मी फेरफार क्र.३४३८ चे चौकशी काम १९६५-६६ ची फाईल वाचली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर फाईलमधील मजकूर तसेच त्यावर असणाऱ्या सहया याबाबत मी सन २००६ पुर्वी कोठेही तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, बापू व देऊ यांच्यामध्ये तडजोड झालेली असल्यामुळे मी फेरफार क्र.३४३८ कामी सन २००६ पर्यंत तक्रार दाखल केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी प्रस्तुत न्यायालयात रे.मु.नं.१९/१९५९ चा दावा विश्राम घाडी वगैरे यांच्या विरोधात दाखल

केला होता. त्या कामातील हुकूमनामा मी वाचला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये स.नं.६१ हि.नं.३७/२ ही या दाव्यातील मिळकत होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर हुकूमनाम्यामध्ये 'कुलकर्णी मालक असता कुलकर्णी तर्फे सदरहू मिळकत वादीचेच कब्जात कूळ म्हणून चालत होती व खरेदी नंतर मालक म्हणून दाव्याची मिळकत वादीचे कब्जात चालत आहे. विरुध्द कब्जानेही वादी हे दाव्याचे मिळकतीचे मालक आहेत' असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.५३ येथील खरेदी खतातील मजकूर माझ्या माहिती प्रमाणे खरा व बरोबर आहे.

१४. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणातील चारही दावा मिळकती सलग आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये एक घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती मध्ये सन १९६५–६६ च्या दरम्यान लावलेली १६ कलमे आहेत. दावा मिळकती मध्ये एकूण १६ कलमे आहेत. त्यापैकी काही कलमांचे सरासरी वय ४५ वर्षे आहे तर काही कलमांचे सरासरी वय २० वर्षे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती मधील विहीर सन २००६ नंतर खोदण्यात आली आहे.

१५. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती या दि.०२/०१/१९४५ रोजीच्या रजिस्टर खरेदी खताने माझे वडील बापू घारु सारंग यांनी स्वत:च्या पैशाने विकत घेतलेल्या स्वकष्टार्जित मिळकती असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी खतावेळी माझे वडील नोकरीस नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी त्यांच्या पगाराच्या पैशातून व त्यांना त्यांच्या मामाने दिलेल्या पैशातून मिळकती खरेदी केल्या हे म्हणणे खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, घारु हे सन १९४४ साली पोर्ट ट्रस्ट मधून निवृत्त झाले. हे म्हणणे खरे नाही की, घारु याने पोर्ट ट्रस्ट मधून निवृत्त झाल्यानंतर मिळालेल्या पैशातून दावा मिळकत खरेदी केली. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती मधील लागवड ही वादी व प्रतिवादी यांनी केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र.३४३८ मध्ये तडजोड

झालेली असताना देखील ४० वर्षानंतर मी अपील दाखल करुन वादी यांचा हक्क नाकारला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र.३४३८ मधील जबाबामध्ये बापू यांनी वादी याचा हक्क मान्य केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा असून आज मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/–

(श्रीकांत एस. पचंडी )

दि.१०/१२/२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड